# खजाना

युरी शुलेव्हिट्झ



इसाकच्या स्वप्नात एक आवाज “तू राजधानीला जा. तेथील राजवाड्याच्या पुलाखाली पुरून ठेवलेला खजाना उकरून बाहेर काढ.” असे तीन वेळा सांगतो. पहिल्या पहिल्यांदा इसाकचा अशा मूर्ख बडबडीवर विश्वास बसला नाही. तरीसुद्धा खरे काय हे जाणून घेण्यासाठी तो राजधानीच्या प्रवासाला निघतो. तो एक मोठा प्रवास असतो.

तो प्रवास त्याला कुठे नेतो? तेथे त्याला काय मिळते? ही जुनी परंतु साहसी कथा तुम्हाला नक्कीच आवडेल.

# खजाना

## युरी शुलेव्हिट्झ

मराठीतः प्रभाकर नानावटी



एकेकाळी एका आटपाट नगरी इसाक नावाचा गरीब माणूस रहात होता.

गरीबीमुळे त्याला दोन वेळा पोटभर जेवणसुद्धा मिळत नव्हते.
अर्धपोटीच तो कित्येक वेळा झोपत होता.



एका रात्री त्याला एक स्वप्न पडले.

स्वप्नात एक आवाज तू राजधानीला जा. तेथे राजवाड्याच्या जवळच्या पुलाखाली सोन्या नाण्यांनी भरलेली खजिन्याची पेटी पुरून ठेवलेली आहे. ती उकरून बाहेर काढ असे सांगत होता.

तो जागा झाला.

“छे! हे तर स्वप्न होते.” असे म्हणत त्या भानगडीत पडला नाही.



दुसऱ्या रात्रीसुद्धा पुन्हा तेच स्वप्न पडले. त्यानी दुर्लक्ष केले.

तिसऱ्या वेळी स्वप्नातील तो आवाज ऐकून त्याला “हे खरे असावे.” असे वाटल्यामुळे राजधानीच्या प्रवासाची तयारी त्यानी केली.





वाटेत जात असताना काही वेळा बैलगाडीतून काही अंतरापर्यंत गाडीवाले नेत होते. परंतु बहुतेक प्रवास त्याला पायी पायीच करावे लागले.



वाटेतील डोंगर ओलांडत होता.



डोंगरावर चढत होता, उतरत होता.



शेवटी एके दिवशी तो राजधानीच्या शहरात पोचला.





राजवाड्याच्या जवळच्या पुलापाशी आल्यानंतर या पुलाची दिवसाचे चोवीस तास राखण करणारे गस्त घालतात हे त्याच्या लक्षात आले.



त्यामुळे पुलाखाली जाऊन खजाना उकरून काढण्याचा विचार त्याला सोडून द्यावे लागले.



तरीसुद्धा तो रोज सकाळपासून रात्रीपर्यंत त्या पुलाच्या जवळपास फेऱ्या मारत होता.



रखवालदारांच्या पथकाच्या प्रमुखाच्या लक्षात ही गोष्ट आली. त्यानी एके दिवशी इसाकला बोलवून “तू रोज येथे का येतोस?” असे विचारले.



त्याच्या स्वप्नात आलेली हकीकत इसाकने सांगितली. प्रमुख जोर जोराने हसायला लागला.

“कसला गरीब माणूस आहेस रे तू? स्वप्नातल्या गोष्टीवर कुणी विश्वास ठेवतात का? माझं ऐक, मीसुद्धा तुझ्या स्वप्नातल्या आवाजासारखा आवाज ऐकला. त्या आवाजानी मला तू रहात असलेल्या शहरात जा. तेथे इसाक नावाच्या माणसाच्या घराखाली खजाना आहे. तो खणून बाहेर काढ.” असे सांगितले. “हे सगळे खोटे असते.” असे म्हणत तो हसायला लागला.



इसाक त्या प्रमुखाला नमस्कार करून घरच्या रस्त्याला लागला.



पुन्हा डोंगरांची चढ-उतार केली.



जंगलाची वाट तुडवली.



काही गाडीवाले त्याला गाडीत बसवून काही अंतरावर सोडत होते. परंतु त्याला घरी पोचण्यासाठी भरपूर पायपीट करावी लागली.



शेवटी तो आपल्या शहराला पोचला.

घरी पोचल्या पोचल्या त्यानी आपले स्वैपाक घर खणून काढले. जमिनीच्या आत पुरून ठेवलेला खजाना उकरून बाहेर काढला.



त्यानी आपल्या शहरात एक प्रार्थना मंदिर बांधले. मंदिराच्या कोपऱ्यातील एका दगडावर *काही वेळा अगदी जवळ असलेल्यासाठीसुद्धा फार लांब लांब जावे लागते.* असे कोरून ठेवले.

इसाकने रक्षकपथकाच्या प्रमुखाला एक रत्नाचा खडा भेट म्हणून पाठवून दिले. तो आता निवांत, सुखी समाधानाचे आयुष्य जगत होता. नंतर कधीही त्याला गरीबी शिवली नाही.

